माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ८५२/२०२२**

अपिलार्थी, श्री. रोशन खुशाल बडोले

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,**
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया, ता.जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (प्रशासन),**
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया, ता.जि. गोंदिया

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०५.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.१२.२०२१ | १०.०१.२०२२ | ०४.०२.२०२२ | ०७.०३.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ३१.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "दिनांक ०१.०३.२०१९ ते ३०.१२.२०२१ या कालावधीतील १) सहायक निबंधक सहकारी संस्था अर्जुनी/मोर यांनी सदर बांधकामाचे मंजुरी दिलेला पत्र आपणास कुणाकडून प्राप्त झाला त्याची सत्य माहिती पुरविणे २) सहायक निबंधक सहकारी संस्था अर्जुनी/मोर यांच्या दि सहकारी भात गिरणी मर्या. सौदड रं.न. ६७१ ता. सडक/अर्जुनी यांनी बांधकामाच्या मंजुरीकरीता वरील कार्यालयात जो प्रस्ताव सादर केला त्या प्रस्तावाची आवक व जावक क्रमाकासहीत सत्य माहिती पुरविणे " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा १ च्या अनुषंगाने कार्यालयाचे अभिलेखात असलेली प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. तसेच सदर मुद्दा प्रश्नार्थक असल्याने माहिती देणे बंधनकारक नाही. तसेच अर्जात मागणी केलेली मुद्दा क्र. २ ची माहिती ही सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर या कार्यालयाचे अधिकार क्षेत्रातील असल्यामुळे आपला माहितीचा अधिकार अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त अर्ज कलम ६(३) अन्वये सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर यांचेकडे वर्ग करण्यात येत असून आपण संबंधित कार्यालयाशी संपर्क करावे. सबब आपला माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गतचा अर्ज या कार्यालयाचे स्तरावरुन निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले व त्याची प्रतिलिपी सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर यांना देण्यात आलेली आहे. त्यानुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था,

अर्जुनी/मोर या कार्यालयाच्या वतीने दिनांक ३१.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, दिनांक ०१.०३.२०१९ ते ३०.१२.२०२१ या तारखेस या कार्यालयाकडून दि. सहकारी भात गिरणी मर्या. सौंदड ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया या संस्थेचे संदर्भात या कार्यालयाकडून कोणतीही पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०४.०२.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलीच नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०७.०३.२०२२ अन्वये, श्री. रोशन खुशाल बडोले यांनी त्यांचे माहिती अधिकारातील अर्ज दिनांक ३१.१२.२०२१ अन्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक अंतर्गत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया व जन माहिती अधिकारी अंतर्गत सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर यांनी पुरविलेली असल्याने श्री. रोशन खुशाल बडोले यांना अपील अर्ज या कार्यालयाचे स्तरावर निकाली काढून दप्तरी दाखल करण्यात येत आहे, असे आदेशित केले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २२.०३.२०२२ रोजी** " मागितलेली माहिती दिली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २३.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १४.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. रोशन बडोले यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०१.२०२२ रोजी मुद्दा १ च्या अनुषंगाने कार्यालयाचे अभिलेखात असलेली प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. तसेच सदर मुद्दा प्रश्नार्थक असल्याने माहिती देणे बंधनकारक नाही. तसेच अर्जात मागणी केलेली मुद्दा क्र. २ च्या माहितीबाबत अर्ज कलम ६(३) अन्वये सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर यांचेकडे वर्ग करण्यात आलेला असून त्याची प्रतिलिपी सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर यांना देण्यात आलेली आहे. त्यानुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर या कार्यालयाच्या वतीने दिनांक ३१.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, दिनांक ०१.०३.२०१९ ते ३०.१२.२०२१ या तारखेस या कार्यालयाकडून दि. सहकारी भात गिरणी मर्या. सौंदड ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया या संस्थेचे संदर्भात या कार्यालयाकडून कोणतीही पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७.०३.२०२२ अन्वये, श्री. रोशन खुशाल बडोले यांनी त्यांचे माहिती अधिकारातील अर्ज दिनांक ३१.१२.२०२१ अन्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक अंतर्गत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया व जन माहिती अधिकारी अंतर्गत सहायक निबंधक, सहकारी संस्था, अर्जुनी/मोर यांनी पुरविलेली असल्याने श्री. रोशन खुशाल बडोले यांना अपील अर्ज या कार्यालयाचे स्तरावर निकाली काढून दप्तरी दाखल

करण्यात येत आहे, असे आदेशित केले. प्रस्तूत प्रकरणी कार्यालयीन अभिलेखावर कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती यापुर्वीच अपिलार्थीस प्रदान केली असल्याचे आढळून येते.

आज झालेल्या सुनावणीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या भुमिकेचा पुनरुच्चार केला आहे. तसेच अपिलार्थी हे आज सुनावणीत अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजु आयोगास ऐकून घेता आलेली नाही. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ चे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद हा माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हया सर्व बाबींचा विचार करुन आदेश पारीत केला आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांना यापुर्वीच उपलब्ध असलेली माहिती प्राप्त झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १४.०५.२०२४

जावक क्रमांक ----ee48---- दिनांक 27 SEP 2024